**आजचे पंचांग**

दिनांक : ३ ऑक्टोबर २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : आश्विन ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : सप्तमी तिथी (सकाळी ०७:५९ पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (४ ऑक्टोबर पहाटे ०१:२९ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र योग : वरीयान योग (दुपारी ०३:२१ पर्यंत) त्यानंतर परिघ योग करण : भाव करण (सकाळी ०७:५९ पर्यंत) त्यानंतर बलवा करण चंद्र राशी : मिथुन राशी सूर्य राशी : कन्या राशी अशुभ मुहूर्त: राहु काळ : सकाळी ०९:२९ ते सकाळी १०:५८ पर्यंत शुभ मुहूर्त: अभिजित : दुपारी १२:०४ ते दुपारी १२:५१

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

**भाजपाचा पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर**

**पुणे :** भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड मध्ये पक्षांतर्गत वाद चव्हाट्यावर येत आहेत असेच म्हणावे लागेल. पटणी यांना दिलेल्या पदावरुन भारतीय जनता पार्टीमध्ये धुसपुस ऐकायला मिळत आहे भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे हे पूर्णपणे भोसरी विधानसभेचे आमदार महेश दादा लांडगे यांच्या आदेशानुसार शहरातील अध्यक्षपदाची धुरा संभाळतात आमदार महेश दादा लांडगे जे पाठीवर खडूने रेखाटून देतात त्याचीच ना वर्णी पदावर लागते पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केले आरोप.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - २ अंक - १० पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### एसआयआरच्या वादानंतर आयोगाची 'डॅमेज कंट्रोल' मोहीम! २० राज्यांत वगळलेल्या मतदारांचा पुन्हा शोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एसआयआरदरम्यान पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळल्याच्या वादाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने २० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेत वगळले गेलेले पात्र मतदार, पहिल्यांदा मतदान करणारे तरुण आणि नव्याने पात्र झालेले युवा मतदार यांची पुन्हा नोंदणी केली जाणार आहे.

आयोगाने संबंधित मुख्य निवडणूक अधिकार्यांना पत्र पाठवून मतदान केंद्रस्तरीय अधिकार्यांना घराघरांत जाऊन पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. एसआयआरपूर्वीची मतदार यादी आणि सध्याची यादी यांची तुलना करून जुन्या यादीत नाव असलेल्या, मात्र सध्याच्या यादीतून गायब झालेल्या मतदारांची स्वतंत्र यादी तयार केली जाणार आहे.

त्यानंतर पात्रता तपासून संबंधित मतदारांकडून नमुना क्रमांक सहा भरून घेतला जाईल. मतदान केंद्रस्तरीय अधिकार्यांना दर आठवड्याला किमान २० ते २५ मतदारांशी संपर्क साधण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून, मोहीम साधारण एका महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

महत्त्वाचे म्हणजे, तयार होणाऱ्या याद्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनाही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मात्र अंतिम निर्णयाचा अधिकार मतदार नोंदणी अधिकार्यांकडेच राहणार आहे. मोहिमेवर मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मतदार नोंदणी अधिकारी देखरेख ठेवणार आहेत.

# एसआयआरचा अहवाल वेळेत येणार का? मतदारांच्या हक्कांचे संरक्षण हीच खरी कसोटी!

## माजी न्यायाधीशांच्या आयोगाकडून घटनात्मक वैधता आणि कार्यपद्धतीची तपासणी; मात्र अंतिम मतदारयादीपूर्वी निष्कर्ष येण्याचे आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

मतदारयादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला (ड्खठ) घटनात्मक आधार आहे का, त्याची कार्यपद्धती कायद्याच्या चौकटीत आहे का आणि या प्रक्रियेत एकाही पात्र मतदाराचे नाव वगळले जाणार नाही ना, या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी माजी न्यायाधीशांचा स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात आला आहे. मात्र, या आयोगाचा अहवाल मतदारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष उपयोगी ठरण्याइतका वेळेत येणार का, हा आता महत्त्वाचा प्रश्न ठरला आहे.

लॉइअर्स असोसिएशन फॉर कॉन्स्टिट्यूशनने स्थापन केलेल्या पाच सदस्यीय आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती एम. बी. लोकूर आहेत. त्यांच्यासोबत माजी न्यायमूर्ती ए. के. पटनायक, जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती बदर दुर्रेझ अहमद, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रेखा शर्मा आणि पाटणा उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती अंजना प्रकाश यांचा समावेश आहे.

या आयोगाकडून एसआयआरचा घटनात्मक आधार, निवडणूक आयोगाने स्वीकारलेली प्रक्रिया, मतदारांना दिलेली संधी आणि पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची संभाव्यता यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे हा अहवाल केवळ कायदेशीर अभ्यास न राहता, मतदाराचा मतदानाचा अधिकार प्रत्यक्षात अबाधित राहतो का, याचीही महत्त्वपूर्ण तपासणी ठरू शकतो.

दरम्यान, निवडणूक आयोगाने एसआयआरचा उद्देश पात्र नागरिक मतदारयादीबाहेर राहू नयेत आणि अपात्र व्यक्तींचा समावेश होऊ नये, असा स्पष्ट केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील एसआयआरबाबत आयोगाच्या अधिकाराला मान्यता दिली असली, तरी प्रत्यक्ष प्रक्रियेत मतदारांना योग्य संधी, सुनावणी आणि दुरुस्तीची सुविधा मिळणे हा स्वतंत्र महत्त्वाचा मुद्दा आहे.

महाराष्ट्रातही एसआयआरच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर नोंदींची पडताळणी सुरू आहे. निवडणूक आयोगाने दावे, हरकती आणि संबंधित प्रक्रियेसाठी मुदत वाढवली असून, मोठ्या संख्येने मतदारांच्या नोंदींची छाननी सुरू असल्याचे वृत्त आहे.

अशा परिस्थितीत माजी न्यायाधीशांचा आयोग नेमका कधीपर्यंत अहवाल देणार, त्यातील निरीक्षणे संबंधित यंत्रणांसमोर कशी मांडली जाणार आणि अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होण्यापूर्वी त्याची दखल घेतली जाणार का, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

कारण मतदारयादीतील चूक नंतर दुरुस्त करता येते; परंतु निवडणुकीच्या वेळी पात्र नागरिकाचे नावच यादीत नसेल, तर त्याचा मतदानाचा मूलभूत लोकशाही अधिकार प्रत्यक्षात वापरता येणार नाही. त्यामुळे एसआयआरवरील कायदेशीर तपासणीचा खरा अर्थ अहवाल प्रसिद्ध होण्यात नव्हे, तर पात्र मतदाराचा अधिकार सुरक्षित राहण्यात आहे. आयोगाचा अहवाल वेळेत येतो का आणि त्याची दखल घेतली जाते का, याकडे आता देशाचे लक्ष लागले आहे.

## जंतर-मंतरवर आंदोलनाला मज्जाव; ७०० हून अधिक आंदोलक ताब्यात, 'लोकशाहीच्या आवाजावर दबाव?'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शुक्रवारी दिल्लीतील जंतर-मंतरकडे निघालेल्या आंदोलकांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली. सुरुवातीला सुमारे ५०० जणांना ताब्यात घेतल्याचे वृत्त होते; नंतर दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार ताब्यात घेतलेल्या आंदोलकांची संख्या ७०० हून अधिक झाली. माजी मुख्यमंत्री आतिशी, आपचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष सौरभ भारद्वज, कार्यकर्ते योगेंद्र यादव आणि एआयएसएच्या अध्यक्षा नेहा बोरा यांचाही त्यात समावेश आहे.

विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एसआयआरमधील कथित अनियमितता आणि मतदारांची नावे वगळल्याच्या आरोपांवरून हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. आंदोलकांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. मात्र, दिल्ली पोलिसांनी गुरुवारीच आंदोलनाला परवानगी नाकारली होती. नव्या दिल्ली परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करून मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त आणि बॅरिकेडिंग करण्यात आली.

आंदोलकांना पोलिसांच्या बसमधून विविध पोलीस ठाण्यांत नेण्यात आले. जंतर-मंतरकडे जाणारे मार्ग रोखण्यात आले, तर सुरक्षेच्या कारणास्तव मध्य दिल्लीतील अनेक मेट्रो स्थानकांवरील प्रवेश-निर्गमन तात्पुरते बंद करण्यात आले.

इथे प्रश्न केवळ एका आंदोलनाचा नाही. निवडणूक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या आंदोलनाला परवानगी नाकारणे, मार्ग बंद करणे आणि शेकडो आंदोलकांना ताब्यात घेणेया कारवाईमुळे सरकार आणि प्रशासनाकडून आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, निवडणूक आयोगाने मतदार यादीतील दुरुस्तीसाठी २० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत विशेष मोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

## सीजेपीच्या आंदोलनात 'जय श्री राम'च्या घोषणा; पोलिसांचा हस्तक्षेप, शिवाजी पार्क परिसरात तणाव टळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दादरच्या शिवाजी पार्क परिसरात सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनात शुक्रवारी घोषणांवरून काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली. आंदोलनस्थळी भगवे मफलर घातलेल्या काही व्यक्तींनी 'जय श्री राम'च्या घोषणा दिल्याने वातावरण बदलले. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून घोषणाबाजी करणाऱ्या व्यक्तींना आंदोलनस्थळापासून बाजूला केले. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच अनुचित प्रकार टळला.

मात्र, घोषणा देणारे हे व्यक्ती कोणत्या राजकीय पक्षाशी किंवा संघटनेशी संबंधित होते, याबाबत तत्काळ स्पष्टता समोर आलेली नाही. त्यामुळे त्यांच्या आंदोलनातील उपस्थिती आणि घोषणाबाजीमागील नेमकी भूमिका याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. मोठ्या संख्येने तरुण-तरुणींसह विविध क्षेत्रांतील व्यक्ती आंदोलनात सहभागी झाल्या. 'ज्ञानू, इट्स डन ब्रो' अशा घोषणांसह सीजेपीने मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील नाराजी व्यक्त केली.

ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, एसआयआर प्रक्रियेची सखोल चौकशी करावी आणि २०२३ चा निवडणूक आयोग कायदा रद्द करावा, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलकांनी आवाज उठवला. आंदोलनादरम्यान पोलिसांचा हस्तक्षेप आणि घोषणाबाजीमुळे मात्र राजकीय आंदोलनाच्या सुरक्षेचा आणि बाहेरील गटांच्या सहभागाचा मुद्दा चर्चेत आला आहे.

## 'ज्ञानेश कुमारांसह 'रंगा-बिल्ला' यांचाही राजीनामा हवा'; हर्षवर्धन सपकाळांचा निवडणूक आयोगावर थेट हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

गांधी जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर तीव्र आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. निवडणूक व्यवस्थेबाबतच्या आरोपांवरून आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला. सपकाळ यांनी 'रंगा-बिल्ला' असा उल्लेख करत या प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधारांच्याही राजीनाम्याची मागणी केली. त्यांच्या या वक्तव्याची स्वतंत्र पुष्टी मात्र उपलब्ध नाही.

मुंबईतील ऐतिहासिक मणिभवनला भेट दिल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सपकाळ यांनी एसआयआर आणि फॉर्म क्रमांक ६ मधील बदलांचा मुद्दा उपस्थित केला. फॉर्म ६ मधील प्रस्तावित बदल मागे घेण्यात आल्याचा दावा करत, निवडणूक निर्णय अधिकारांशी संबंधित काही कामे खासगी कंपनीकडे देण्याचा निर्णय कोणी घेतला, याचा खुलासा व्हावा, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, सपकाळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारावरही टीका करत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे सांगितले आणि आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली. महागाईच्या मुद्द्यावरही त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.

गांधी जयंतीदिनी निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनांना राजकीय पाठिंबा मिळत असताना, एसआयआर आणि मतदार नोंदणीचा वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा दणका! एमपीएससी सचिव महेंद्र हरपाळकरांची तडकाफडकी बदली; सरकारचा शासन निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असतानाच सरकारने मोठा प्रशासकीय निर्णय घेतला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र उत्तमराव हरपाळकर यांची सचिवपदावरील प्रतिनियुक्ती प्रशासकीय कारणास्तव संपुष्टात आणण्यात आली असून, सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे.

एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, कारभारातील त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांवरून गेल्या काही काळापासून आंदोलन सुरू आहे. २ ऑक्टोबर रोजी पुण्यात होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या चर्चेत विद्यार्थ्यांनी सचिवांच्या बदलीसह प्रमुख मागण्या मांडल्या होत्या. सचिवांची बदली करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आता सरकारने त्याची अंमलबजावणी केली आहे. हरपाळकर यांची एमपीएससी सचिवपदी दोन वर्षांसाठी प्रतिनियुक्ती करण्यात आली होती. मात्र, कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची प्रतिनियुक्ती समाप्त करण्यात आली आहे. पुढील पदस्थापना कुठे होणार, याबाबत स्वतंत्र आदेश काढला जाणार आहे.

दरम्यान, सचिवपदाचा कार्यभार त्यांनी एमपीएससी अध्यक्षांच्या संमतीने अन्य अधिकाऱ्याकडे तातडीने सोपवावा, असेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सरकारकडून थेट प्रशासकीय निर्णय झाल्याने एमपीएससीच्या पुढील कारभाराबाबत आता अपेक्षा आणि प्रश्न दोन्ही वाढले आहेत.

# डॉक्टरांनाच सुरक्षेसाठी न्यायालयाची पायरी; मग आरोग्यव्यवस्थेची जबाबदारी कोणाची?

## सर्वोच्च न्यायालयाची कठोर टिप्पणी; उपचारांवरील तक्रारींचा मार्ग कायदेशीर, हिंसाचाराचा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली। प्रतिनिधी

रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी दिवस-रात्र काम करणाऱ्या डॉक्टरांनाच त्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठवावा लागतो, ही परिस्थिती आरोग्यव्यवस्थेसमोरील गंभीर प्रश्न अधोरेखित करणारी आहे. उपचारांबाबत तक्रार असू शकते, डॉक्टरांच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात; परंतु धमकी, दबाव किंवा मारहाण स्वीकारली जाऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. (डळींश डुत्रऋश्र)

न्यायालयाच्या निरीक्षणाचा गाभा साधा आहे ज्या डॉक्टराच्या हातात रुग्णाचे जीवन आणि आरोग्य सोपविले जाते, त्यालाच जर शारीरिक हिंसाचाराची भीती वाटत असेल, तर त्याच्याकडून पूर्णपणे स्वतंत्र आणि विवेकी व्यावसायिक निर्णयाची अपेक्षा कशी करायची? डॉक्टरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ एका व्यावसायिक गटाचा प्रश्न नसून सार्वजनिक आरोग्यसेवेच्या गुणवत्तेशी संबंधित आहे.

महाराष्ट्रातील डोंबिवली येथील महापालिका रुग्णालयात डॉक्टरांवर झालेल्या कथित हल्ल्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानेही वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांकडे गांभीर्याने पाहिले. २८ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयाने आरोपीला दिलेला जामीन रद्द करून आत्मसमर्पणाचे निर्देश दिले आणि वैद्यकीय क्षेत्रावर अशा प्रकारे हल्ले होऊ नयेत, असा स्पष्ट संदेश जाणे आवश्यक असल्याचे नमूद केले. (डळींश डुत्रऋश्र)

हा प्रश्न केवळ एखाद्या रुग्णालयातील सुरक्षेपुरता मर्यादित नाही. केंद्र सरकार असो किंवा राज्य सरकार आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षित कार्यस्थळ उपलब्ध करून देणे, हल्ल्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करणे आणि रुग्णांच्या तक्रारींसाठी प्रभावी, पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे ही शासनव्यवस्थेची जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही वैद्यकीय संस्थांमध्ये मूलभूत सुरक्षा उपाय, सीसीटीव्ही आणि आपत्कालीन मदत यंत्रणा उभारण्याबाबत राज्यांना निर्देश दिले आहेत. (अझख डळळऋश्र)

मग प्रश्न असा आहे की, डॉक्टरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न वारंवार न्यायालयाच्या दारातच का पोहोचतो? आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी आधीच प्रभावी यंत्रणा का उभी राहू नये? एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज का निर्माण व्हावी?

'मोदी सरकारच्या काळात ही परिस्थिती का निर्माण झाली?' हा राजकीय आरोप म्हणून नव्हे, तर शासनाच्या उत्तरदायित्वाच्या संदर्भात विचारला जाणारा प्रश्न आहे. आरोग्य हा केंद्र आणि राज्य या दोन्ही स्तरांवरील धोरणांचा महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे कोणत्याही सरकारचे मूल्यमापन करताना केवळ रुग्णालयांची संख्या किंवा आरोग्य योजनांची घोषणा नव्हे, तर डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात किती सुरक्षित कार्यपरिसर मिळतो, हा प्रश्नही नागरिकांनी विचारणे आवश्यक आहे.

डॉक्टरांनीही नागरिक म्हणून मतदान करताना आपल्या सुरक्षिततेसह आरोग्यव्यवस्थेच्या प्रश्नांकडे पाहणे स्वाभाविक आहे. मात्र कोणाला मतदान करावे, हा निर्णय प्रत्येक मतदाराने स्वतःच्या विवेकाने घ्यायचा आहे. त्यासाठी एक मूलभूत प्रश्न नक्की विचारता येतो 'जे इतरांचे जीव वाचवतात, त्यांना स्वतःच्या संरक्षणासाठी न्यायालयाची मदत घ्यावी लागणार नाही, अशी व्यवस्था कोण उभी करणार?'

कारण डॉक्टर सुरक्षित असतील, तरच ते भीतीमुक्त वातावरणात निर्णय घेऊ शकतील; आणि भीतीमुक्त डॉक्टर ही केवळ वैद्यकीय क्षेत्राची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनाची गरज आहे.

## संपादकीय

### आज गांधीजींची गरज आहे!

डिजिटल तंत्रज्ञान, आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण आणि राजकीय महत्त्वाकांक्षांच्या वेगवान युगात महात्मा गांधींचे विचार कालबाह्य झाले आहेत का, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो. आधुनिक भारताची विकासाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल, जागतिक महासत्ता बनण्याची महत्त्वाकांक्षा आणि तंत्रज्ञानातील प्रगती पाहता गांधीजींच्या सत्य, अहिंसा, स्वदेशी आणि ग्रामस्वराज्याच्या विचारांची आज कितपत गरज आहे, अशी शंका काही जण व्यक्त करतात. मात्र, देशाच्या वर्तमान परिस्थितीकडे डोळसपणे पाहिले, तर गांधीजींचे विचार कालबाह्य झालेले नसून आजच्या काळात त्यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.

गांधीजींचे महत्त्व केवळ स्वातंत्र्यलढ्यापुरते मर्यादित नाही. ते माणसाला माणसाशी जोडणारे, सत्तेला नैतिकतेची जाणीव करून देणारे आणि विकासाला सामान्य माणसाच्या कल्याणाची दिशा दाखवणारे विचारवंत होते. म्हणूनच आजच्या भारतात गांधीजींच्या विचारांचे मूल्यमापन केवळ राजकीय घोषणांच्या आधारे नव्हे, तर प्रत्यक्ष सामाजिक परिस्थितीच्या कसोटीवर होणे आवश्यक आहे.

आज समाजमाध्यमांच्या माध्यमातून माहितीचा प्रसार वेगाने होतो; परंतु त्याचबरोबर अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि सामाजिक ध्रुवीकरणालाही खतपाणी मिळते. वैचारिक मतभेदांचे रूपांतर व्यक्तिगत शत्रुत्वात होण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. अशा परिस्थितीत गांधीजींचा अहिंसा, सहिष्णुता आणि संवादाचा मार्ग अधिक महत्त्वाचा ठरतो. लोकशाहीत विरोधी मताचा आदर करणे म्हणजे कमकुवतपणा नव्हे, तर लोकशाहीच्या परिपक्वतेचे लक्षण आहे. मतभेद असले तरी मनभेद वाढू न देणे, हीच गांधीवादी विचारांची खरी कसोटी आहे.

दुसरीकडे, भारताच्या आर्थिक प्रगतीची चर्चा मोठ्या प्रमाणावर होत असताना या प्रगतीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो आहे का, हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. मोठे उद्योग, भव्य पायाभूत सुविधा आणि जागतिक स्तरावरील आर्थिक महत्त्वाकांक्षा यांना विरोध करण्याचे गांधीजींच्या विचारांचे सार नव्हते; मात्र विकासाच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असला पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. शेतकरी, शेतमजूर, कामगार, बेरोजगार तरुण आणि ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या जीवनात प्रत्यक्ष सुधारणा घडत नसेल, तर विकासाच्या आकडेवारीला सामाजिक न्यायाची जोड कशी मिळणार? ग्रामस्वराज्य आणि सर्वोदयाच्या संकल्पना आजही याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यास मदत करतात.

स्वच्छतेच्या बाबतीतही गांधीजींचे विचार केवळ स्मरणापुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. स्वच्छ भारत अभियानासारख्या उपक्रमांना गांधीजींच्या स्वच्छतेविषयक आग्रहाची प्रेरणा लाभली असली, तरी स्वच्छता ही केवळ सरकारी मोहीम किंवा प्रसिद्धीचा विषय न राहता नागरिकांच्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे. त्याचप्रमाणे वाढते प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमर्याद वापर यांसारख्या समस्यांवर उपाय शोधताना गांधीजींच्या संयमित उपभोगाच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व लक्षात येते. गरजा आणि हव्यास यांतील फरक ओळखणे ही आजच्या उपभोगवादी समाजाची मूलभूत गरज आहे.

आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया यांसारख्या संकल्पनांच्या चर्चेतही स्वदेशी विचाराचे महत्त्व अधोरेखित होते. स्थानिक उद्योग, लघुउद्योग, कुटीर व्यवसाय आणि ग्रामीण रोजगाराला बळ दिल्याशिवाय आर्थिक स्वावलंबनाचा पाया व्यापक होऊ शकत नाही. मात्र, स्वदेशीचा अर्थ केवळ देशांतर्गत उत्पादन वाढवणे इतकाच नसून, स्थानिक कौशल्यांना संधी देणे, रोजगारनिर्मिती करणे आणि आर्थिक विकासाचा लाभ समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचवणे हाही आहे.

गांधीजींच्या विचारांचा उल्लेख करणे सोपे आहे; परंतु त्यांचे आचरण करणे अधिक कठीण आहे. स्वच्छतेचा संदेश देताना स्वतः अस्वच्छता करणे, अहिंसेची भाषा वापरताना विरोधकांविषयी द्वेष पसरवणे किंवा गरीबांच्या कल्याणाची घोषणा करताना त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, यात गांधीवादाचा आत्मा हरवतो. त्यामुळे गांधीजींच्या विचारांचे मूल्यमापन कोणत्या राजकीय पक्षाने त्यांचा कितीदा उल्लेख केला, यावर नव्हे, तर सत्य, सामाजिक सलोखा, समानता आणि सामान्य माणसाच्या सन्मानासाठी किती प्रयत्न केले जातात, यावर व्हायला हवे.

आज भारताला आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सामर्थ्य आणि जागतिक स्तरावरील प्रगतीची नक्कीच गरज आहे. पण त्याचबरोबर विवेक, सहिष्णुता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचीही आवश्यकता आहे. भौतिक विकासाची उंची गाठताना माणुसकीची खोली हरवली, तर त्या प्रगतीचा अर्थ काय उरतो? हा प्रश्न गांधीजींचे विचार आपल्यासमोर पुन्हा पुन्हा उभा करतात.

म्हणूनच गांधीजी केवळ इतिहासाच्या पानांवर जतन करून ठेवण्याची व्यक्ती नाहीत. त्यांच्या विचारांशी असहमती असू शकते, त्यांची चिकित्सा होऊ शकते; परंतु सत्य, अहिंसा, सर्वधर्मसमभाव, स्वावलंबन आणि शेवटच्या माणसाच्या कल्याणाची तत्त्वे आजही समाजाला दिशा देऊ शकतात. आधुनिक भारताला विकासाचा वेग हवा आहेच; पण त्या वेगाला योग्य दिशा देणारा विवेकही हवा आहे. गांधीजींची गरज आजही आहे, कारण राष्ट्र मोठे होण्यासाठी केवळ अर्थव्यवस्था मोठी होणे पुरेसे नसते; त्या राष्ट्रातील माणूसही मोठा झाला पाहिजे.

# भाजपमधील संघटनात्मक नियुक्त्यांवरून कार्यकर्त्यांत चर्चा

## संजय पटनी यांच्या नियुक्तीवर सचिन काळभोर यांचे प्रश्न; जुन्या कार्यकर्त्यांना संधी देण्याची मागणी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर भाजपमधील अलीकडील संघटनात्मक नियुक्त्यांवरून पक्षातील काही जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. संजय पटनी यांची शहर जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या यापूर्वीच्या पदांच्या पार्श्वभूमीवर नियुक्ती प्रक्रियेबाबत पक्षातील काही कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.



संजय पटनी यांची काही महिन्यांपूर्वी शहर भाजपच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. त्यानंतर १ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांची शहर जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी पक्षांतर्गत संधीवाटपाबाबत भूमिका मांडली आहे. पक्षासाठी अनेक वर्षे आंदोलने, मोर्चे, नागरिकांच्या प्रश्नांचा पाठपुरावा तसेच संघटनात्मक काम करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांनाही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

एकाच व्यक्तीला एकापेक्षा अधिक महत्त्वाची पदे देण्याऐवजी पक्षासाठी दीर्घकाळ काम करणाऱ्या विविध कार्यकर्त्यांना संधी द्यावी. आमच्यावर विश्वास नाही का? असा प्रश्न काळभोर यांनी उपस्थित केला.

संघटनात्मक नियुक्त्या करताना कार्यकर्त्यांशी व्यापक चर्चा करून निर्णय घेतल्यास अधिक कार्यकर्त्यांना जबाबदारीची संधी मिळू शकते, असेही त्यांनी म्हटले आहे. स्थानिक पातळीवरील नियुक्त्यांबाबत पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वानेही दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, २९ सप्टेंबर रोजी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पिंपरी-चिंचवड दौऱ्यात पक्षाच्या संघटनात्मक विषयांवर चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील नियुक्त्यांबाबत सुरू झालेल्या चर्चेकडे पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व कशा पद्धतीने पाहते, याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्याशी प्रतिक्रिया घेण्यासाठी प्रतिनिधीने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ न शकल्याने या विषयावरील त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

## महापालिकेत गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये दोन्ही थोर नेत्यांच्या प्रतिमांना उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्या अनुराधा गोरखे, उपआयुक्त अण्णा बोदडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते युवराज दाखले यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचा आग्रह धरत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप दिले. असहकार आंदोलन आणि भारत छोडो आंदोलनामुळे ते देशातील स्वातंत्र्यसैनिक व देशभक्तांसाठी प्रेरणास्थान ठरले. माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री हे साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेच्या आदर्शासाठी ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली देशवासीयांनी सैन्यदलाच्या पाठीशी ठामपणे उभे राहत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. गांधी आणि शास्त्री यांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये थरार! पत्नी पळवून नेल्याच्या संशयावरून तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला; मध्यस्थी करणाऱ्या वडिलांनाही मारहाण, चार जण जेरबंद

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पत्नीला पळवून नेल्याच्या संशयावरून एका तरुणावर धारदार कोयत्याने सपासप वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना वाल्हेकरवाडी येथे घडली आहे. भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला गेलेल्या तरुणाच्या वडिलांवर आणि चुलत्यावरही कोयत्याने वार करण्यात आले. याप्रकरणी चिंचवड पोलिसांनी तात्काळ कारवाई करत चार आरोपींसह एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणेआठच्या सुमारास वाल्हेकरवाडी येथील न्यू वुड हॉटेल शेजारील रस्त्यावर हा रक्तरंजित प्रकार घडला. आरोपी अभिषेक यादव याच्या पत्नीला इरफान शेख याने पुन्हा पळवून नेल्याचा संशय आरोपींना होता. या रागातून आरोपी अभिषेक यादव, अभिषेक शितोळे, नागेश चोपडे आणि दोन अनोळखी इसमांनी इरफानला गाठले.

आरोपींनी इरफानवर कोयत्याने पाठीत मणक्याजवळ, उजव्या हाताच्या अंगठ्यावर, डाव्या हाताच्या पंज्यावर आणि कोपऱ्यावर सपासप वार केले, तसेच डोक्याच्या डाव्या बाजूला कपाळावर वार करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. आपला जीव वाचवण्यासाठी इरफान रस्त्याने पळत सुटला असता, आरोपींनी हातात कोयते हवेत फिरवून दहशत माजवत त्याचा पाठलाग केला. "तुला किती पळायचे पळ, तुला जिवंत सोडणार नाही, कोणी मध्ये आले तर कोणालाच सोडणार नाही," अशी उघड धमकी देत आरडाओरड केली.

**वडिलांवरही कोयत्याने वार**

मुलाचा जीव धोक्यात असल्याचे पाहून फिर्यादी इस्माईल गणी शेख (वय ४७) आणि त्यांचे बंधू अहमद शेख यांनी आरोपींना अडवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यांच्यावरही कोयत्याने वार करून त्यांना जखमी केले.

**पोलिसांची धडक कारवाई**

या घटनेप्रकरणी फिर्यादी इस्माईल शेख यांच्या तक्रारीवरून चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अप्पूघरात सर्रास वृक्षतोड? प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; प्रमोद कुटे आक्रमक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

निगडी प्राधिकरणातील अप्पूघर आणि दुर्गा टेकडी परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, वृक्षतोडीस परवानगी नेमकी कोणी दिली? आणि नियमांचे पालन झाले आहे का? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

शहरात एकीकडे पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि हरित क्षेत्र वाढविण्याच्या मोठ्या-मोठ्या घोषणा केल्या जात असताना, दुसरीकडे मात्र हिरवीगार झाडे बेकायदेशीरपणे तोडली जात आहेत. या विरोधाभासामुळे महापालिका प्रशासन नेमके काय करत आहे, असा प्रश्न विचारला जात आहे.

या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी नगरसेवक प्रमोद कुटे यांनी केली आहे. त्यांनी खालील मागण्या प्रशासनासमोर मांडल्या आहेत:



* तातडीने पाहणी: वृक्षतोडीच्या ठिकाणी महापालिका प्रशासन आणि पर्यावरण व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी.
* परवानगीची तपासणी: संबंधित झाडे तोडण्यासाठी अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का आणि परवानगीतील अटींचे पालन झाले आहे का, याची सखोल तपासणी व्हावी.
* कठोर कारवाई: परवानगी नसताना वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून तात्काळ वृक्षतोड थांबवावी.

शहराच्या वाढत्या काँक्रिटीकरणामुळे आधीच पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. अशा परिस्थितीत नैसर्गिक साधनसंपत्ती लाभलेल्या दुर्गा टेकडी परिसरातील झाडेही तोडली जात असतील, तर भविष्यात नागरिकांना याची मोठी पर्यावरणीय किंमत मोजावी लागू शकते.

त्यामुळे विकासाच्या नावाखाली सुरू असलेली वृक्षांची कत्तल कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका प्रमोद कुटे यांनी मांडली आहे.

# ऑनलाइन सेवा कर भरण्यास झोपडपट्टीवासीयांचा प्रतिसाद

## पहिल्या सहामाहीत २६.१५ लाखांची वसुली; ८३१ पावत्यांद्वारे कर जमा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत महापालिकेच्या इतिहासात प्रथमच ६१० कोटी ४४ लाखांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. पहिल्या सहामाहीत विविध कर सवलतींचा लाभ घेत कर भरणाऱ्यांचा आलेख झपाट्याने वाढत आहे. यंदा ७ लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्ता धारकांपैकी ५ लाख ९ हजार २०० नागरिकांनी म्हणजे तब्बल ६६.४७ टक्के मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला आहे. दरवर्षीप्रमाणे ऑनलाइन माध्यमातून बिल भरण्यास नागरिकांनी मोठी पसंती दिली आहे.

शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ७ लाख ६६ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा एसएमएस पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे पहिल्या सहामाहीत कर भरणाऱ्यांचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे.

गतवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत ४ लाख ७८ हजार २६८ मालमत्ता धारकांनी ६०३ कोटींचा कर भरणा केला होता. यंदा नोंदणीकृत ७ लाख ६६ हजार मालमत्ता धारकांपैकी ५ लाख ९ हजार २०० मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी तब्बल ६१० कोटी ४४ लाख रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. गतवर्षापेक्षा ६ कोटी ६२ लाख रुपयांची अधिकची वसुली झाल्याचे उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले.

### वाकड झोनची सर्वाधिक कर वसुली

महापालिकेची १८ करसंकलन विभागीय कार्यालये आहेत. यामध्ये वाकड करसंकलन कार्यालयाने सर्वाधिक तब्बल ८४ कोटी ९१ लाख, त्यापाठोपाठ थेरगाव ५३ कोटी १५ लाख, कस्पटे वस्ती कार्यालयाने ४५ कोटी १९ लाख, किवळेतून ४४ कोटी ९१ लाख, पिंपरी नगर ४४ कोटी ९९ लाख, चिखली करसंकलन कार्यालयाने ४४ कोटी ६१ लाख तर सर्वात कमी तळवडे कार्यालयाने ११ कोटी ९९ लाख रुपयांचा कर वसूल केला आहे.

### मागील चार वर्षांत सहामाहीत वसुलीचा वाढता आलेख

२०२३-२४ : ५९० कोटी ६० लाख
२०२४-२५ : ५१२ कोटी ६२ लाख
२०२५-२६ : ६०३ कोटी ८२ लाख
२०२६-२७ : ६१० कोटी ४४ लाख

### निवासी मालमत्ता धारकांची कर भरण्यात आघाडी

निवासी : ४ लाख ५१ हजार ७३९
बिगरनिवासी : ४० हजार १९७
मिश्र : १० हजार ४४
औद्योगिक : ३ हजार ६६७
मोकळ्या जमीन : ३ हजार ४८९

मालमत्ता कर हा महापालिकेच्या महसुलाचा महत्त्वाचा स्रोत आहे. महापालिकेच्या इतिहासात पहिल्या सहामाहीत प्रथमच ६१० कोटींचा कराचा भरणा झाला आहे. कर भरून शहर विकासात योगदान देणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार. यापुढील काळात थकबाकीदार मालमत्तांकडून कर वसुलीला प्राधान्य देण्यात येणार आहे.

**– डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

मालमत्ता कर संकलन अधिक प्रभावी करण्यासाठी १८ करसंकलन विभागीय कार्यालयांचे उद्दिष्टनिहाय नियोजन करण्यात आले. प्रत्येक कार्यालयाच्या कामकाजाचा नियमितपणे आढावा घेऊन उपलब्ध आकडेवारीच्या आधारे वसुलीची दिशा निश्चित करण्यात आली. आढावा बैठकांमधून कार्यालयनिहाय प्रगती, थकबाकीदार मालमत्ता आणि वसुलीची स्थिती यांचा सविस्तर आढावा वेळोवेळी घेण्यात आला. त्यामुळे आतापर्यंत सर्वाधिक कर वसुली करण्यात यश आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# आंबेगाव तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे रमेश येवले यांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर: प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व व उत्तर भागात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून बाधित गावांचा दुष्काळी उपाययोजनांमध्ये समावेश करावा. तसेच पात्र शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती व शासकीय मदत मिळावी, अशी मागणी शिवसेना नेते रमेश येवले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्रे केली आहे.

मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये ढअॅळससशअॅ-१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध सवलती व उपाययोजना लागू केल्या आहेत. मात्र, या यादीत आंबेगाव तालुक्याचा समावेश नसल्याचे येवले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

तालुक्याची सरासरी आकडेवारी विचारात घेण्याबरोबरच गावनिहाय व महसूल मंडळनिहाय प्रत्यक्ष परिस्थितीचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. लोणी, धामणी, शिरदाळे, मांदळेवाडी, वडगावपीर, पहाडदरा आदी गावांमध्ये पावसातील खंड व अनिश्चिततेचा खरीप पिकांना फटका बसला आहे. सोयाबीन, बाजरी तसेच अन्य पिकांची स्थिती, पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांची स्वतंत्र पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सातगाव पठाराची स्वतंत्र पाहणी करण्याची मागणी

कुरवंडी, कोल्हारवाडी, थूगाव, भावडी, कारेगाव, पेठ आणि पारगाव तर्फे खेड या सातगाव पठारातील गावांचाही स्वतंत्रपणे आढावा घ्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या भागातील बटाटा हे प्रमुख नगदी पीक असून सोयाबीन, वाटाणा व भाजीपाला पिकांचीही लागवड केली जाते. पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या या भागात पर्जन्यमान, पावसातील खंड, पीकस्थिती, जलस्रोत आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता या निकषांवर फेरतपासणी करावी, असे येवले यांनी म्हटले आहे.

बाधित गावांमध्ये पीकनुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना जमीन महसूल सवलत, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या वीजबिलात सवलत, रोजगार हमीची कामे, पिण्याचे पाणी तसेच चारा व पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

आगामी रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील जलस्रोत व भूजलस्थितीचा आढावा घेऊन पाणी उपलब्धतेचे पूर्वनियोजन करावे. तालुक्याची सरासरी परिस्थिती समाधानकारक दिसत असली तरी बाधित भौगोलिक भागासाठी गावनिहाय वस्तुनिष्ठ निकषांवर स्वतंत्र निर्णय घ्यावा, अशी मागणी रमेश येवले यांनी केली आहे.

### सारांश वृत्त

#### खळबळजनक! महाळुंगे स्मशानभूमीजवळ तरुणावर चाकूने सपासप वार; जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना बेड्या

■ चाकण / महाळुंगे :

महाळुंगे परिसरात एका तरुणावर जुन्या वादातून किंवा किरकोळ कारणावरून धारदार चाकूने सपासप वार करत त्याला जीवे ठार मारण्याचा थरारक प्रयत्न करण्यात आला आहे. महाळुंगे स्मशानभूमीजवळील मोकळ्या रस्त्यावर ही रक्तरंजित घटना घडली. याप्रकरणी उत्तर महाळुंगे पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल श्यामकुमार निषाद (वय २३, रा. सावरदरी रोड, मूळ रा. मिर्झापूर, उत्तर प्रदेश) हे महाळुंगे येथील एका खासगी इंजिनिअरिंग कंपनीत कामाला आहेत. ३० सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास राहुल हे महाळुंगे स्मशानभूमीजवळील रस्त्यावरून जात असताना आरोपींनी त्यांना गाठले. आरोपी ओम चंद्रकांत बहादुरे आणि अनिल रामराव आघाडे यांनी कोणतीही दयामाया न दाखवता राहुल यांच्यावर हल्ला चढवला. ओम बहादुरे याने धारदार चाकू काढून राहुल यांच्या थेट गळ्याच्या खाली वार केले. तर अनिल आघाडे याने दोन्ही हातांवर चाकूने सपासप वार करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. "तुला जिवंत सोडणार नाही," अशी धमकी देत शिवीगाळ करून त्याला जागीच ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. दोन्ही आरोपी गजाआड या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या राहुल निषाद यांनी दिलेल्या तक्रारीवरून उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत: ओम चंद्रकांत बहादुरे (वय २४ वर्षे, रा. मेहकर, जि. बुलढाणा) अनिल रामराव आघाडे (वय ५४ वर्षे, रा. मेहकर, जि. बुलढाणा) या दोन्ही आरोपींना अटक केली आहे. आरोपींवर भारतीय न्याय संहिता (इछछ) कलम १०९ (हत्येचा प्रयत्न), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) तसेच भादंवि कलम ३०७, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ढोले आणि पोलीस उपनिरीक्षक मुल्ला करत आहेत.

# भीमाशंकर कारखान्याकडून सभासद, ऊस उत्पादकांना दिवाळीची गोड भेट

### पारगाव-दत्तात्रयनगर येथील साखर वाटपाचा धामणी येथे शुभारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

पारगाव-दत्तात्रयनगर येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासद व ऊस उत्पादकांना साखर वाटपाचा शुभारंभ शुक्रवारी (दि. २) धामणी (ता. आंबेगाव) येथे करण्यात आला.

दिवाळीच्या आनंदात सभासद व ऊस उत्पादकांचा सहभाग वाढविण्यासह त्यांच्या कुटुंबीयांसोबत सणाचा गोडवा वाढावा, या उद्देशाने दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येतो. साखर वाटपाच्या शुभारंभाला धामणी गावच्या लोकनियुक्त सरपंच प्रतिक्षा जाधव यांच्यासह बाळशिराम जाधव, राजेंद्र जाधव, दीपक जाधव, दादाभाऊ भगत, बाळासाहेब विधाटे, रामदास विधाटे, सुहास रोडे, सुधाकर जाधव, रंगनाथ करंजखेले, सोमनाथ जाधव, प्रथमेश विधाटे, पंडित जाधव तसेच ग्रामस्थ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कारखान्याच्या वतीने लोणी, वडगावपीर आणि मांदळेवाडी येथेही सभासद व ऊस उत्पादकांना साखर वाटप करण्यात आले. वडगावपीर व मांदळेवाडी येथील साखर वाटपाचे नियोजन कारखान्याचे शेतकी अधिकारी योगेश आदक तसेच कर्मचारी निलेश गावडे व गणेश भोर यांनी केले.

# 'मागण्या मान्य नाही झाल्या तर मीही आंदोलनात उतरेन'; धनंजय मुंडेंचा विद्यार्थ्यांना शब्द, सरकारवर दबाव वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**



स्पर्धा परीक्षांच्या तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने पुण्यात आता राजकीय वळण घेतले आहे. शास्त्री रस्त्यावरील अहिल्यादेवी अभ्यासिकेजवळ विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची शुक्रवारी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी भेट घेतली. विद्यार्थ्यांच्या मागण्या जाणून घेतल्यानंतर मुंडे यांनी थेट सरकारलाच इशारा दिला.

विद्यार्थ्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर मीसुद्धा तुमच्यासोबत आंदोलनात सहभागी होईन, असा शब्द मुंडे यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिल्याचा दावा त्यांनी केला. मुख्यमंत्र्यांशी फोनवरून चर्चा झाली असून, पुढील आठवड्यात विद्यार्थ्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा, परीक्षेतील पारदर्शकता आणि औषध निरीक्षक घोटाळ्यासह विविध मुद्द्यांवर विद्यार्थी आंदोलन करत आहेत. मी इथे तुमचे आंदोलन पाहायला नाही, तर तुमच्यासोबत लढायला आलो आहे, असे मुंडे म्हणाले. येत्या परीक्षेत वस्तुनिष्ठ पद्धतीचा अवलंब केला जाईल, असा मुख्यमंत्र्यांनी शब्द दिल्याचा दावाही त्यांनी केला. मी एकदा उतरलो की माघार घेणार नाही, असे सांगत मुंडे यांनी मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होण्याची भूमिका स्पष्ट केली.

त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर सरकारची पुढील भूमिका काय असणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# धामणीत गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

धामणी (ता. आंबेगाव) येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.



याप्रसंगी धामणी गावच्या लोकनियुक्त सरपंच प्रतिक्षा जाधव, सखाराम (बाप्पू) जाधव, माजी उपसरपंच निलेश रोडे, बाळासाहेब विधाटे, गणपतराव भूमकर, सोसायटी सचिव भाऊसाहेब सोनवणे, गणपतराव भांडारकर, शिशिर बढेकर, हरिभाऊ जाधव, बाळासाहेब जाधव यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचे विचार तसेच लालबहादूर शास्त्री यांचा साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेचा आदर्श आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सिप्लाच्या पुण्यातील औषध गोदामाचा परवाना रद्द; औषध साठवणुकीपासून नोंदीपर्यंत गंभीर त्रुटी, एफडीएची कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे: प्रतिनिधी**

औषधांची सुरक्षितता आणि वैधानिक नियमांच्या पालनातील त्रुटींवरून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सिप्ला फार्मा अँड लाईफ सायन्सेस लिमिटेडच्या पुण्यातील सी अँड एफ गोदामाचा औषध विक्री व वितरण परवाना रद्द केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कंपनीला सुनावणीची संधी दिल्यानंतर एफडीएने १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकारण आदेश जारी केला.

या प्रकरणात ४ सप्टेंबरला सुधारित कारणे दाखवा नोटीस, ११ सप्टेंबरला कंपनीचे लेखी उत्तर आणि २१ सप्टेंबरला वैयक्तिक सुनावणी झाली. त्यानंतर तपासणीतील निष्कर्ष आणि कंपनीचे स्पष्टीकरण विचारात घेऊन परवाना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.





तपासणीत 'रिॲक्टिन प्लस' या अनुसूची एच औषधाच्या पॅकेजिंगवर वेदनाशामक आणि दाहशामक वापराबाबत विविध दावे तसेच मानवी आकृतीद्रे औषधाचा परिणाम दर्शविल्याचे आढळले. एफडीएच्या मते, यामुळे औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० अंतर्गत मिसब्रँडिंगचा मुद्दा निर्माण झाला.

गोदामातील परिस्थितीनेही गंभीर प्रश्न उपस्थित केले. आवश्यक अर्ज ३५ तपासणी पुस्तक उपलब्ध नव्हते, औषधांचे बॉक्स रॅक किंवा पॅलेटऐवजी थेट जमिनीवर ठेवले होते, साठ्यावर धूळ होती आणि मुदतबाह्य औषधांसाठी स्वतंत्र क्षेत्र, फलक, विल्हेवाटीची एसओपी व अभिलेख उपलब्ध नसल्याचे आढळले.

याशिवाय खरेदी-विक्री पावत्यांतील त्रुटी आणि संगणकीय नोंदी व प्रत्यक्ष औषधसाठ्यात तफावत आढळली. या तफावतीत प्रतिजैविक औषधांचाही समावेश होता. एफडीएने स्पष्ट केले की, केवळ संगणकीय नोंदी दाखवून प्रत्यक्ष साठवणूक, अभिलेख आणि स्वच्छतेच्या वैधानिक जबाबदाऱ्यांतून सूट मिळू शकत नाही.

# आंबेगाव, हवेली तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करा

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र; बाधित शेतकरी व नागरिकांना मदतीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर: प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२६ मध्ये आंबेगाव व हवेली तालुक्यांत निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा. तसेच बाधित शेतकरी व नागरिकांना दुष्काळी अनुदान, सवलती व आवश्यक शासकीय मदत द्यावी, अशी मागणी शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

डॉ. कोल्हे यांनी २९ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन या मागणीकडे लक्ष वेधले आहे. मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये ढअॅळससशअॅ-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध सवलती व उपाययोजना लागू केल्या आहेत. मात्र, शिरूर लोकसभा मतदारसंघातील आंबेगाव व हवेली तालुक्यांचा या यादीत समावेश झालेला नाही. त्यामुळे निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

आंबेगावच्या पूर्व भागात पिकांना फटका

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, शिरदाळे, मांदळेवाडी, वडगावपीर आणि पहाडदरा या गावांमध्ये अपुऱ्या पर्जन्यमानामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसातील खंडाचा पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर परिणाम झाला असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याच्या उपलब्धतेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



गावनिहाय प्रत्यक्ष पाहणीची मागणी

केवळ तालुकास्तरीय सरासरी पर्जन्यमानाच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यमापन न करता गावनिहाय प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी डॉ. कोल्हे यांनी केली आहे. महसूल, कृषी व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी पर्जन्यमान, पीकस्थिती, पीकनुकसान आणि पाणी उपलब्धतेचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन अहवाल सादर करावा, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

हवेली तालुक्यातील थेऊर, लोणी काळभोर तसेच परिसरातील गावांमध्येही यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पिके, शेती आणि स्थानिक पाणी उपलब्धतेवर परिणाम झाल्याचे पत्रात म्हटले आहे. त्यामुळे हवेली तालुक्याचाही दुष्काळी निकषांवर स्वतंत्रपणे विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बाधितांना मदतीचे निर्देश देण्याची मागणी

आंबेगाव व हवेली तालुक्यांतील परिस्थितीची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक अहवाल मागवावेत. पर्जन्यमान, पीकस्थिती, पीकनुकसान व पाणी उपलब्धता या निकषांचा विचार करून दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली आहे.

बाधित शेतकरी व नागरिक दुष्काळी मदतीपासून वंचित राहू नयेत, यासाठी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश देऊन दुष्काळी अनुदान, सवलती आणि शासकीय मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### खेडमध्ये जीवघेणा काळाबाजार उघडकीस! घरगुती गॅस सिलिंडरमधून अवैध रिफिलिंग करणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा; मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण : प्रतिनिधी**

नागरिकांच्या जिवाशी खेळून व्यावसायिक नफ्यासाठी घरगुती गॅस सिलिंडरमधून अवैधपणे गॅस चोरी करणाऱ्या रॅकेटचा उत्तर चाकण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. बिरदवडी परिसरातील एका भाड्याच्या खोलीवर पोलिसांनी धाड टाकून विनापरवाना चालणारा हा गोरखधंदा उद्ध्वस्त केला आहे.

भाड्याच्या खोलीत सुरू होता स्फोटक खेळ

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास बिरदवडी गावच्या हद्दीत आकाश पवार यांच्या भाड्याच्या खोलीमध्ये अवैध गॅस रिफिलिंग सुरू होते. कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय, लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा अत्यंत निष्काळजी पद्धतीने व्यावसायिक गॅस टाकीमधून काळ्या पाईपच्या साहाय्याने घरगुती गॅस टाक्यांमध्ये गॅस भरला जात होता.

१०,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

उत्तर चाकण पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार बाळू दुंदा मराडे (वय ४०) यांनी या अड्ड्यावर छापा टाकला असता, आरोपी घरगुती वापराच्या 'ज्वालाग्राही' गॅस सिलिंडरमध्ये अवैधपणे गॅस भरताना रंगेहात पकडला गेला. पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे १० हजार ५०० रुपये किमतीच्या गॅस टाक्या, काळी नोझल पाईप आणि रिफिलिंगचे साहित्य जप्त केले आहे. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासन आणि ग्राहकांची उघड फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## सारांश वृत्त

### ‘जेलमधून वाल्मीक कराडचा फोन’चा दावा कारागृह प्रशासनाने फेटाळला; ३२ सीमकार्ड, २२ मोबाईलच्या आरोपांवरही स्पष्टीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बीड : प्रतिनिधी

विलास घुले यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात आपल्याला आणि आपल्या मुलाला अडकवण्यासाठी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडने बीड जिल्हा कारागृहातून कट रचल्याचा खासदार बजरंग सोनवणे यांनी केलेला आरोप कारागृह प्रशासनाने फेटाळून लावला आहे. कराडने कारागृहातून फोन केल्याचे कथित रेकॉर्डिंगही सोनवणे यांनी माध्यमांसमोर आणले होते.

कारागृह अधीक्षक रामराव चांदणे यांनी मात्र कराडने कारागृहातून बाहेर फोन केला नसल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रत्येक कैद्याला आठवड्यातून तीन वेळा, प्रत्येकी दहा मिनिटे, तीन नोंदणीकृत नातेवाईकांशी दूरध्वनीवरून बोलण्याची सुविधा आहे. यंत्रणेत केवळ प्रमाणित तीन क्रमांकच उपलब्ध असतात; चौथा क्रमांक डायल करता येत नाही. सोनवणे यांनी कराडकडे ३२ सीमकार्ड आणि २२ मोबाईल फोन असल्याचा, तसेच त्याच्या बराकीत सीसीटीव्ही नसल्याचा आरोप केला होता. प्रशासनाने हे आरोपही फेटाळले. कारागृहात २०६ सीसीटीव्ही कॅमेरे असून कराडच्या कोठडीसमोर १२ हायटेक कॅमेरे असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, जुन्या कॉलिंग व्यवस्थेतील तांत्रिक त्रुटीमुळे कॉन्फरन्स कॉलची शक्यता होती. मात्र, ही सुविधा गेल्या चार महिन्यांपासून बंद करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. यापूर्वीच्या दोन उच्चस्तरीय चौकशीतही प्रशासनाची चूक आढळली नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

# मुंबईच्या रस्त्यांवर इस्रायलचा सलाम; कॅप्टन स्मित मच्छार यांच्या धैर्याची जगभर दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई । प्रतिनिधी

दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात निर्माण झालेल्या जीवघेण्या संकटात १७४ प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी निर्णायक भूमिका बजावणारे मुंबईचे कॅप्टन स्मित मच्छार यांच्या धैर्याला आता इस्रायलने सार्वजनिकरित्या सलाम केला आहे. मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर इस्रायलच्या वाणिज्य दूतावासाने कॅप्टन मच्छार यांच्या छायाचित्रांसह मोठे फलक लावले आहेत.

वॉर्डन रोड-नेपियन सी रोड जंक्शन, वांद्रे पूर्वेतील प्रबोधनकार ठाकरे उड्डाणपुलाजवळ, बीकेसी-सायन कनेक्टर, अंधेरी-जोगेश्वरी उड्डाणपूल आणि माहीमजवळील तुळशी पाइपलाइन रोड अशा मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणी हे फलक लावण्यात आले आहेत. त्यावर, ढहरपङ्ग र्धी, उर्रीरिळप डाळीं, त्रेॲ डर्रीळपस खीॲरश्रळ डळींशी! थळीहळपस र्धी र डशिशवू ठशर्लेीशॲू असा संदेश देण्यात आला आहे.

३० सप्टेंबर रोजी फ्लाइट एफझेड १०७३मध्ये कॉकपिटमध्ये सहवैमानिकाकडून झालेल्या हल्ल्यात कॅप्टन मच्छार जखमी झाले. विमान हजारो फूट खाली घसरत असतानाही



त्यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडून इतरांना हस्तक्षेपाची संधी दिली. त्यानंतर प्रवासी आणि कर्मचाऱ्यांनी हल्लेखोराला नियंत्रणात आणले आणि विमानाचे सौदी अरेबियातील तबूक येथे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

या घटनेनंतर कॅप्टन मच्छार यांच्या धैर्याची भारतासह इस्रायलमध्ये मोठ्या प्रमाणावर दखल घेण्यात आली. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनीही त्यांच्या भूमिकेचे कौतुक केले आहे. मात्र या संपूर्ण घटनेने विमान सुरक्षेचा आणखी एक गंभीर प्रश्न समोर आणला आहे. विमानाच्या कॉकपिटमध्येच असा हिंसक हल्ला कसा घडला, सुरक्षा यंत्रणांमध्ये नेमकी कोणती त्रुटी राहिली आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी कोणती पावले उचलली जाणार, याची चौकशी महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, कॅप्टन मच्छार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे वृत्त आहे.

## पंजाब सीमेवर दोन संशयित घुसखोर ठार; तरणतारणमध्ये बीएसएफची कारवाई, सीमासुरक्षेवर पुन्हा प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जालंधर । प्रतिनिधी

पंजाबमधील भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर शुक्रवारी सीमा सुरक्षा दल अर्थात बीएसएफने दोन संशयित पाकिस्तानी घुसखोरांना गोळीबारात ठार केले. तरणतारण जिल्ह्यातील सीमावर्ती भागात दुपारच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बीएसएफच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन संशयित हालचाली सुरक्षा दलाच्या निदर्शनास आल्या. त्यानंतर जवानांनी कारवाई करत दोघांवर गोळीबार केला. या कारवाईत दोघांचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर सीमावर्ती परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, संशयितांची ओळख आणि ते कोणत्या उद्देशाने भारतीय हद्दीत प्रवेश करत होते, याचा तपास सुरू आहे. घटनास्थळ आणि परिसराची सुरक्षा यंत्रणांकडून तपासणी केली जात आहे.

पंजाबची पाकिस्तानसोबतची आंतरराष्ट्रीय सीमा तब्बल ५५३ किलोमीटर लांब आहे. त्यामुळे या भागात घुसखोरी, अमली पदार्थांची तस्करी आणि सीमापार हालचाली रोखण्याचे आव्हान सुरक्षा यंत्रणांसमोर कायम असते.

मात्र या घटनेतील दोघे नेमके कोण होते, त्यांनी सीमा कशा प्रकारे ओलांडली आणि त्यांच्या हालचालीमागे कोणता उद्देश होता, याबाबत अधिकृत तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट चित्र समोर येणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे पंजाबच्या आंतरराष्ट्रीय सीमेवरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## यासिन मलिकसह सात जणांवर मनी लॉँडरिंगचे आरोप निश्चित करण्याचे आदेश; पाकिस्तानातून हवाला मार्गे निधी आल्याचा ईडीचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीरमधील फुटीरतावादी कारवायांशी संबंधित कथित आर्थिक व्यवहारांच्या प्रकरणात दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने महत्त्वाचा आदेश दिला आहे. बंदी घातलेल्या जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा (जेकेएलएफ) प्रमुख यासिन मलिक याच्यासह सात आरोपींविरोधात मनी लॉँडरिंगचे आरोप निश्चित करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणात पुढील सुनावणी ३० ऑक्टोबरला होणार आहे.

विशेष न्यायाधीश प्रशांत शर्मा यांनी ९ सप्टेंबर रोजी या प्रकरणात आरोपींविरोधात आरोप निश्चित करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने उपलब्ध सामग्रीच्या आधारे प्रथमदर्शनी ठोस संशय असल्याचे निरीक्षण नोंदवले. आरोपींविरोधात मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत आरोप



निश्चित करण्यात येणार आहेत.

यासिन मलिकसह झहूर अहमद शाह वटाली, अब्दुल रशीद शेख, शबीर अहमद शाह, नवल किशोर कपूर, ट्रायसन फार्म्स अँड कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मसरत आलम भट हे आरोपी आहेत.

अंमलबजावणी संचालनालयाच्या अर्थात ईडीच्या आरोपानुसार, पाकिस्तानमधील काही संस्थांकडून निधी हवाला मार्गाने भारतात आणण्यात आला आणि त्याचा वापर फुटीरतावादी अजेंडा पुढे नेण्यासाठी करण्यात आला. या आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरमधील कथित फुटीरतावादी नेटवर्कला आर्थिक पाठबळ मिळाल्याचा तपास यंत्रणेचा दावा आहे.

मात्र, आरोप निश्चित करण्याचा न्यायालयाचा आदेश हा दोष सिद्ध झाल्याचा अंतिम निकाल नाही. खटल्यातील पुरावे, आरोपींचे बचाव आणि पुढील न्यायालयीन प्रक्रिया यानंतरच आरोपांची कायदेशीर सत्यता निश्चित होणार आहे.

यासिन मलिक यापूर्वीच दहशतवादी कारवायांसाठी निधी पुरवल्याच्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. त्यामुळे नव्या मनी लॉँडरिंग प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रिया त्याच्यावरील आधीच्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवरही महत्त्वाची ठरणार आहे.

# मराठवाडा दुष्काळात होरपळतोय, सुरेश धसांची हेलिकॉप्टरने ‘शाही एंट्री’!; ऊसतोड कामगार मेळाव्यावरून सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बीड । वडवणी । प्रतिनिधी

मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना शेतकरी, कष्टकरी आणि पशुपालक पाणी, चारा आणि रोजगारासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत वडवणी येथे झालेल्या ऊसतोड कामगार, मुकादम आणि वाहतूकदारांच्या मेळाव्यासाठी आष्टी-पाटोदा-शिरूरचे आमदार सुरेश धस यांनी हेलिकॉप्टरने एंट्री केल्याने बीडमध्ये राजकीय चर्चा रंगली आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाने प्रशासकीय यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून, अधिकारी दुष्काळ निवारणाच्या कामात व्यस्त आहेत. अशावेळी शेकडो किलोमीटर दूर ऊसतोडीसाठी जाणाऱ्या कष्टकऱ्यांच्या मेळाव्यात लोकप्रतिनिधी हेलिकॉप्टरने पोहोचल्याने दुष्काळात हेलिकॉप्टरची गरज नेमकी का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

धस यांनी वडवणीकडे




रवाना होण्यापूर्वी हेलिकॉप्टरचा फोटो सोशल मीडियावरही शेअर केला. त्यामुळे या दौऱ्याची अधिक चर्चा झाली. विशेष म्हणजे धस हे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करणारे आणि सामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरणारे आमदार म्हणून ओळखले जातात.

त्यामुळेच त्यांच्या या हेलिकॉप्टर प्रवासाबाबत नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले आहे. दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आलेल्या लोकप्रतिनिधीची ही ‘हायफाय’ एंट्री नेमकी का झाली? याचे स्पष्टीकरण धस यांच्याकडून अपेक्षित आहे.

## ४४ वर्षांचा दुष्काळ संपला! चीनला नमवत भारतीय महिला हॉकी संघ आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णविजेता

■ दैनिक राज्य लोकतंत्र
टोकियो : वृत्तसंस्था

भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावत तब्बल ४४ वर्षांचा प्रतीक्षा काळ संपवला. अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या चीनचा भारताने १-० असा पराभव केला आणि दुसऱ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेचे सुवर्णपदक आपल्या नावावर केले.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. मात्र, भारताच्या लालरेम्सियामीने दहाव्या




मिनिटाला केलेला गोल निर्णायक ठरला. त्यानंतर चीनने बरोबरी साधण्यासाठी आक्रमक प्रयत्न केले, पण भारतीय बचावफळीने प्रत्येक हल्ला परतवून लावत आघाडी कायम राखली.

या विजयामुळे भारतीय महिला हॉकी संघाने १९८२ नंतर प्रथमच आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकले आहे. भारताचे हे या स्पर्धेतील दुसरे महिला हॉकी सुवर्णपदक ठरले.

या ऐतिहासिक कामगिरीचे आणखी एक मोठे महत्त्व म्हणजे या विजयामुळे भारताला लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट पात्रता मिळाली आहे.

त्यामुळे भारतीय महिला हॉकीसाठी आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे सुवर्णपदक केवळ पदक नसून ऑलिम्पिकच्या दिशेने उघडलेले महत्त्वाचे दार ठरले आहे.

## ‘रशियावर हल्ला झाला तर सर्व शस्त्रांचा वापर करू’; पुतिन यांचा पाश्चिमात्य देशांना थेट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मॉस्को । प्रतिनिधी

रशिया आणि युरोपमधील वाढता तणाव आता अधिक धोकादायक वळणावर पोहोचला आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी गुरुवारी, १ ऑक्टोबर रोजी स्पष्ट शब्दांत इशारा देत, रशियाच्या कोणत्याही भूभागावर हल्ला झाल्यास मॉस्को आपल्या शस्त्रसाठ्यातील ‘सर्व शस्त्रांचा’ वापर करून प्रत्युत्तर देईल, असे म्हटले.

येथे झालेल्या वाल्दाई चर्चासत्रात बोलताना पुतिन यांनी रशिया युरोपीय देशांवर हल्ल्याची कोणतीही योजना आखत नसल्याचा दावा पुन्हा केला. मात्र, पाश्चिमात्य देश आणि युरोप रशियाशी संभाव्य युद्धाची तयारी करत असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्यावर तणाव वाढवल्याचा आरोप केला.

ाल्टिक समुद्रातील लष्करी सराव, रशियन जहाजांवर कारवाई आणि भविष्यात रशियाशी युद्धाची तयारी याबाबत युरोपीय देशांकडून होत असलेल्या चर्चेवरही पुतिन यांनी तीव्र आक्षेप घेतला.

दरम्यान, काही युरोपीय नेते आणि गुप्तचर यंत्रणांनी रशिया आगामी काही वर्षांत दुसऱ्या देशावर लष्करी कारवाई करण्यास सक्षम होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. विशेषतः युक्रेनमधील युद्ध रशियाच्या बाजूने संपल्यास हा धोका वाढू शकतो, असा त्यांचा अंदाज आहे.

रशियाचा इशारा आणि युरोपची युद्धतयारी यामुळे युरोपमधील सुरक्षा समीकरणे पुन्हा एकदा गंभीर टप्प्यावर आली आहेत.

# वाहतूक दंडाचा ४९ हजार कोटींचा डोंगर; सर्वोच्च न्यायालयाने यंत्रणांना धरले धारेवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / प्रतिनिधी

वाहतुकीचे नियम मोडल्यावर सामान्य नागरिकाला काहीशे किंवा काही हजार रुपयांचा दंड भरावा लागतो. मात्र देशभरात वाहनचालकांकडून न भरलेल्या ई-चलानची एकत्रित रक्कम तब्बल ४९,१९४.०५ कोटी रुपये असल्याची माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर आली आहे. विशेष म्हणजे, उत्तर प्रदेशातील सुमारे ५९४ किलोमीटर लांबीच्या गंगा एक्सप्रेसवेची ३६,२३० कोटी रुपयांची किंमत या थकीत दंडाच्या रकमेपेक्षा तब्बल १२,९६४ कोटी रुपयांनी कमी आहे.

या आकडेवारीने देशातील वाहतूक नियमांच्या अंमलबजावणीतील मोठी दरी समोर आणली आहे. ई-चलान काढले जात आहेत, दंड आकारला जात आहे; पण दंडाची प्रत्यक्ष वसुली किती प्रभावीपणे होते, हा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयानेच उपस्थित केला आहे. उपलब्ध माहितीनुसार, ४९,१९४.०५ कोटी रुपयांच्या थकीत ई-चलानपैकी २६,१७५.०५ कोटी रुपये वसूल झाले आहेत.

या प्रकरणाची सुनावणी २८ सप्टेंबर २०२६ रोजी झाली. न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने केवळ चलान काढून थांबण्याऐवजी त्याची वसुली सुनिश्चित करण्याची गरज अधोरेखित केली. न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना थकीत ई-चलान असलेल्या वाहनांवर कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

यापुढे थकीत दंड असलेल्या वाहनांची परिवहन पोर्टलवर नोंद काळ्या यादीत करण्याची तरतूद लागू करण्यात आली आहे. त्यामुळे अशा वाहनांची विक्री किंवा मालकी हस्तांतरण रोखले जाऊ शकते. वाहन नोंदणीचे नूतनीकरण, फिटनेस प्रमाणपत्र आणि प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र म्हणजेच पीयूसी देण्यावरही निर्बंध आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अनेक




वाहतूक उल्लंघने करणाऱ्या व्यक्तीच्या वाहनचालक परवान्याच्या नूतनीकरणावरही कारवाई होऊ शकते.

यामागचा मूलभूत प्रश्न मात्र आणखी गंभीर आहे दंडाची रक्कम एवढी मोठी होईपर्यंत वसुली यंत्रणा नेमकी काय करत होती? एखाद्या नागरिकाकडून ५०० किंवा १,००० रुपयांचा दंड वसूल करण्यासाठी तत्पर असणारी यंत्रणा हजारो कोटी रुपयांच्या थकबाकीवर किती प्रभावीपणे काम करत होती, हा प्रश्न या आकडेवारीमुळे उपस्थित होतो.

गंगा एक्सप्रेसवेचे उदाहरण याचे प्रमाण स्पष्ट करते. मेरठ ते प्रयागराज जोडणाऱ्या या सहा पदरी, प्रवेश-नियंत्रित मार्गाची लांबी सुमारे ५९४ किलोमीटर असून त्यासाठी ३६,२३० कोटी रुपये खर्च झाले आहेत.

म्हणजेच देशातील थकीत वाहतूक दंडाची रक्कम केवळ ‘दंड न भरलेल्या वाहनचालकांची यादी’ नाही; ती अंमलबजावणी आणि वसुली व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवरचा मोठा प्रश्नचिन्ह आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर आता या हजारो कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी प्रत्यक्ष किती रक्कम वसूल होते आणि नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई किती परिणामकारकपणे होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, वीज बिलांशी थकीत ई-चलान जोडून वसुली करण्याची शक्यता सुनावणीदरम्यान चर्चेत आली होती; मात्र २८ सप्टेंबरच्या लिखित आदेशात हा उपाय समाविष्ट करण्यात आलेला नाही. त्यामुळे सध्या न्यायालयाच्या औपचारिक निर्देशांचा केंद्रबिंदू वाहन जप्ती, वाहनविषयक ऑनलाइन सेवा रोखणे, काळ्या यादीत टाकणे आणि प्रमाणपत्रे तसेच परवान्यांवरील निर्बंध हा आहे.